# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 02.04.2026** **वार- गुरुवार**

---

**उद्योगांनाएलपीजी**

पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्वदेशी उद्योगाबरोबर परदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसंच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्य शासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करत आहे, असं राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी आज सांगितलं. या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. पुण्यातील परदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना एलपीजी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी स्वीडन, जपान आणि दक्षिण कोरियाच्या महावाणिज्य दूतांच्या विनंतीवरून मुंबईत आज एक बैठक झाली; त्यावेळी रावल बोलत होते.

**महा-साधनासप्ताह**

केंद्र सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या वतीनं आजपासून ८ एप्रिलपर्यंत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. राज्यातही ‘महा- साधना सप्ताह’ राबवण्यात येणार आहे. या कालावधीत पुणे विभागातील सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली कार्यक्षमता वाढवावी, आणि 'iGOT कर्मयोगी भारत' पोर्टलवर लॉग इन करुन किमान ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करावेत, असं आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केलं आहे.

**दक्षिणमुख्यालयप्रमुख**

लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाच्या प्रमुखपदी लेफ्टनंट जनरल संदीप जैन यांची नियुक्ती झाली असून त्यांनी काल लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांच्या कडून पदाची सूत्र स्वीकारली. लेफ्टनंट जनरल धीरज सेठ यांनी काल लष्कराचे 'उप-प्रमुख' म्हणून पदभार स्वीकारला. लेफ्टनंट जनरल संदीप जैन राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचे माजी विद्यार्थी आहेत.

**हनुमानजयंती**

पुण्यात आज हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील सर्वच हनुमान मंदिरांमध्ये पहाटे जन्मोत्सव साजरा झाला; सकाळपासूनच भाविकांनी मंदिरांमध्ये दर्शनासाठी गर्दी केली होती.

**शिवपुण्यतिथी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार पुण्यतिथी आहे. यानिमित्त राज्यभरात शिवरायांना आदरांजली वाहण्यात येत आहे. अनेक नागरिकांनी आज दुर्गदुर्गेश्वर रायगडासह राज्यातील विविध गड-किल्ल्यांना भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं.

**छत्रपतीमहाराणीताराराणी**

‘छत्रपती महाराणी ताराराणी’ या पुस्तकाचं प्रकाशन आज पुण्यात संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते झालं. छत्रपती शिवाजी महाराजांचं स्वराज्य टिकवणं ही आपली जबाबदारी आहे, या भावनेतून, महाराणी ताराराणी यांनी कार्य केलं. उत्तम युद्ध आणि प्रशासकीय कौशल्य असलेल्या ताराराणी यांचं कार्य, त्यांचा संघर्ष या पुस्तकाच्या माध्यमातून समाजपर्यंत पोहोचेल, असा विश्वास संभाजीराजे छत्रपती यांनी यावेळी व्यक्त केला. महाराणी ताराराणी यांच्या ३५१व्या जयंती वर्षानिमित्त; सरहद पुणे, नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन आणि मराठी भाषा विभागाने, दिल्लीमध्ये महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या, पहिल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेनलाचं आयोजन केलं आहे. या निमित्ताने या सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं होतं. महापौर मंजुषा नागपुरे, सरहदचे संस्थापक संजय नहार, पुस्तकाचे लेखक मयूर मसूरकर, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांना छत्रपती महाराणी ताराराणी पुरस्काराने गौरवण्यात आलं.

**<u>उमेदवारीअर्ज</u>**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवार उभा न करण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने घेतला आहे; मात्र अन्य पाच जणांनी आतापर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. हे पाचही उमेदवार पुणे जिल्ह्याच्या बाहेरचे असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

जतमधील सतीश कदम, सांगोल्यातील राघू घुटूकडे, साताऱ्यातील शरद भिसे, बुलडाणा इथले गजानन गवळी आणि उल्हासनगरच्या त्रिशला कांबळे यांनी या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरला आहे. येत्या सहा एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील; सात एप्रिलला अर्जांची छाननी आणि नऊ एप्रिल पर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान आणि चार मे रोजी मतमोजणी होणार आहे.

**<u>पाऊस</u>**

पुणे शहर आणि परिसराला आज दुपारी पावसाने अक्षरश: झोडपून काढलं. शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगरांमध्ये आणि पिंपरी चिंचवडमध्येही सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला. मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं. पावसाचा जोर प्रचंड असल्यानं जंगली महाराज रस्ता, दांडेकर पूल, पर्वती परिसर, सहकारनगर, सारसबाग, धनकवडी भागात ठिकठिकाणी पाणी साठलं होतं. शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहनकोंडी झाल्याने अनेक ठिकाणची वाहतूक पर्यायी मार्गांनी वळवण्यात आली होती.

आगामी दोन दिवसातही शहर आणि परिसरात मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**